MHKO180004132017

# नियमीत दिवाणी दावा क्र.१५०/२०१७ मधील
# निशाणी क्र.५७ खालील आदेश.
# [ राहिन शहाजहान तहसिलदार वि. आप्पासो गंगाराम वाघमारे (महार) आणि इतर ]

वादी यांनी दिवाणी प्रक्रिया संहिताचे कलम VI नियम १७ अन्वये प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

०२. वादी यांच्या कथनानुसार, प्रस्तुतचा दावा प्रलंबीत असतेवेळी प्रतिवादी क्र.१ हे मयत झाले असून प्रतिवादी क्र.१ यांचे वारस अभिलेखावर घेण्याकरीता वादी यांनी निशाणी क्र.४६ अन्वये अर्ज दाखल केला आहे. प्रतिवादी क्र.१ यांना निशाणी क्र.४६ वरील अर्जामध्ये नमूद केलेल्या वारसांव्यतिरीक्त अन्य दोन वारस असून सदर दोन वारसांचे नाव निशाणी क्र.४६ वरील अर्जामध्ये नमूद करण्याचे वादी यांच्याकडून नजरचुकीने व अनावधानाने राहून गेले आहे. निशाणी क्र.४६ अन्वये अर्ज दाखल केल्यानंतर वादी यांना उपरोक्त नमूद चुक अवगत झाली. उपरोक्त नमूद चूक अनावधानाने व नजरचुकीने झालेली असल्यामुळे त्याबाबत निशाणी क्र.४६ मध्ये योग्य ती दुरुस्ती करण्याकरीता वादी यांना प्रस्तुत अर्ज दाखल करणे भाग पडले आहे. प्रस्तुत नमुद दुरुस्ती मंजुर केल्यास प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. याउलट, सदर दुरुस्ती न केल्यास वादी यांचे कधीही न भरुन येणारे नुकसान होणार आहे. त्यामुळे, प्रस्तुत अर्ज मंजुर करण्यात यावा, अशी विनंती वादी यांनी केली आहे.

०३. प्रतिवादींनी प्रस्तुत अर्जावर त्यांचे म्हणणे दाखल करुन प्रस्तुत अर्ज खर्चासह नामंजूर करण्यात यावा, अशी विनंती केली आहे. प्रतिवादींनी वैकल्पीकरित्या असे नमूद केले आहे की, प्रस्तुतचा अर्ज मंजूर करण्याच्या निर्णयापावेतो हे न्यायालय आल्यास प्रस्तुतचा अर्ज जास्तीत जास्त खर्चासह मंजूर करण्याबाबत आदेश करण्यात यावेत.

०४. उभयपक्षाच्या विद्यमान वकीलांचा युक्तिवाद ऐकण्यात आला. दोन्ही पक्षांतर्फे त्यांच्या कथनानुरुप युक्तिवाद करण्यात आला.

०५. दावा, प्रस्तुत अर्ज व त्यावर प्रतिवादींनी दाखल केलेल्या म्हणण्याचे अवलोकन करण्यात आले. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, निशाणी क्र.४६ वरील अर्जामध्ये प्रतिवादी क्र.१ यांच्या नमूद केलेल्या तीन वारसांव्यतिरिक्त प्रतिवादी क्र.१ यांना अन्य दोन वारस असून सदर दोन वारसांची नावे निशाणी क्र.४६ वरील अर्जामध्ये नमूद करण्याचे वादी यांच्याकडून नजरचुकीने व अनावधानाने राहून गेल्यामुळे सदरची चुक दुरुस्त करुन निशाणी

क्र.४६ वरील अर्जामध्ये त्याबाबत योग्य ती दुरुस्ती करण्याकरीता वादी यांना प्रस्तुतचा अर्ज दाखल करणे भाग पडल्याचे प्रथमदर्शनी दिसून येत आहे. प्रस्तावित दुरुस्ती ही निशाणी क्र.४६ वरील अर्जाचा व दाव्याचा गुणवत्तेवर निकाल लावण्याकरीता आवश्यक असल्याचे अभिलेखावरुन दिसून येत आहे. तसेच, वादी यांना प्रस्तुत अर्जामधील प्रस्तावित दुरुस्ती करण्यास परवानगी दिल्यास त्यामुळे प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नसल्याचे व दाव्याच्या स्वरुपाचे कोणताही बदल होणार नसल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे, वरील सर्व बाबींचा विचार करता, प्रस्तुतचा अर्ज प्रस्तुतचा अर्ज खर्चासह मंजुर करणे न्यायोचित होईल. वादी यांनी निशाणी क्र.४६ वरील अर्ज दिनांक ३१.०१.२०२५ रोजी दाखल केला असून प्रस्तुतचा अर्ज दिनांक २९.०६.२०२६ रोजी दाखल केल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे, वादी यांना प्रस्तुत अर्ज दाखल करण्यास झालेला विलंब विचारात घेता, प्रस्तुतचा अर्ज पाचशे रुपये इतक्या खर्चासह मंजूर करणे न्यायोचित होईल. सबब, खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे :–

**:: आदेश ::**

१. प्रस्तुत अर्ज रक्कम रुपये ५००/– (अक्षरी रक्कम रुपये पाचशे फक्त) इतक्या खर्चासह मंजुर करण्यात येत आहे.

२. वादी यांनी पुढील तारखेपर्यंत निशाणी क्र.४६ वरील अर्जामध्ये प्रस्तुत अर्जातील नमुद दुरुस्ती करुन सदर अर्जाची दुरुस्ती प्रत प्रस्तुत दाव्यात दाखल करावी. तसेच, सदर दुरुस्त अर्जाची प्रत्येकी एक प्रत प्रतिवादींना द्यावी.

३. वादींनी खर्चाची रक्कम रुपये ५००/– (अक्षरी रक्कम रुपये पाचशे फक्त) ही प्रतिवादींना द्यावी.

४. येणेप्रमाणे अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

(आदेश खुल्या न्यायालयात निवेदित व अधिघोषीत करण्यात आला.)

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by BALASAHEB SHRIPATRAO GAIKWAD
Date: 2026.07.02 17:54:11 +0530

दिनांक : ०२.०७.२०२६
कुरुंदवाड.

(बाळासाहेब श्री. गायकवाड)
दिवाणी न्यायाधीश क. स्तर ,
कुरुंदवाड.